# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com


## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १२/०८/२०२५

## जिल्हा :पुणे

**मागील आठवडयाचे हवामान :**

**मागील आठवडयाचे हवामान :** पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान २८.४ ते ३१.१ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २१.२ ते २२.९ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ८२ ते ९० टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ५३ ते ७२ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी २.९ ते ७.१ कि.मी. होता.

**हवामान अंदाज :** पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान २४ ते २७ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २१ ते २२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ९० ते ९३ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ६९ ते ८३ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०९ ते १० कि.मी. दरम्यान राहील. आकाश पूर्णतः ढगाळ राहील. वाऱ्याची दिशा आग्नेयेकडून वायव्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (०६/०८/२०२५ ते १२/०८/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१२/०८/२०२५ ते १६/०८/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | दिनांक | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 1.2 | 2.3 | 0.0 | 0.3 | पाऊस (मिमी) | 10 | 9 | 10 | 18 | 20 |
| 30.4 | 28.4 | 31.0 | 29.6 | 29.2 | 31.1 | 30.9 | कमाल तापमान(अं.से.) | 27 | 26 | 24 | 24 | 25 |
| 22.9 | 21.5 | 22.8 | 21.5 | 21.2 | 22.6 | 21.9 | किमान तापमान(अं.से.) | 22 | 22 | 21 | 21 | 22 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 8 | 8 | 8 | 8 | 8 |
| 87 | 88 | 84 | 87 | 90 | 82 | 87 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 90 | 90 | 93 | 92 | 92 |
| 65 | 72 | 64 | 66 | 53 | 57 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 69 | 71 | 83 | 79 | 79 |
| 6.0 | 2.9 | 5.1 | 3.6 | 3.9 | 6.8 | 7.1 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 10 | 9 | 10 | 9 | 9 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 268 | 266 | 261 | 263 | 263 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १२ व १३ ऑगस्ट, २०२५ रोजी तुरळक (जिल्ह्याच्या सुमारे ०-२५ %) ठिकाणी तर दिनांक १४ व १५ ऑगस्ट, २०२५ रोजी काही (जिल्ह्याच्या सुमारे २६-५० % ) ठिकाणी तर दिनांक १६ ऑगस्ट, २०२५ रोजी बऱ्याच (जिल्ह्याच्या सुमारे ५१-७५ %) ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात<br>➢ दिनांक १२, १३ व १४ ऑगस्ट, २०२५ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० किमी/तास), मेघगर्जना, विजासह पावसाची शक्यता आहे.<br>➢ दिनांक १४ व १५ ऑगस्ट, २०२५ रोजी घाट क्षेत्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.<br>➢ दिनांक १६ ऑगस्ट, २०२५ रोजी घाट क्षेत्रात तुरळक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक १७ ते २३ ऑगस्ट, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • घाट क्षेत्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता असल्याने शेतातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा |

| | | |
|---|---|---|
| | | निचरा करावा.<br>• तुरळक ठिकाणी वादळी वारा , मेघगर्जना, विजासह पावसाची शक्यता असल्याने फळबागांना आधार द्यावा.<br>• पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून, जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास, विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• पावसाळ्यामध्ये फवारणी करताना स्टिकर, मिनरल ओईल इ. चा वापरावे.<br>• कीटकनाशक आणि तणनाशकाची फवारणी करताना वेगवेगळी करावी.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाचा पूर्वानुमाना करिता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| **भात** | पिक वाढीची अवस्था | नवीन लागण केलेल्या भात खाचरात रोपांच्या वाढीच्या अवस्थेत पाण्याची पातळी २ ते ३ सें.मी. ठेवावी. तपकिरी तुडतुडे आणि हिरवे तुडतुडे किडीच्या नियंत्रणा साठी फिप्रोनिल ५ एस.सी. २० मि.ली. किंवा फ्लोनिकॅमिड ५० डब्ल्यू. जी. ३ ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एस.एल. २ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी.<br>भात पिकामध्ये अधिक उत्पादन (२०%) व आर्थिक फायद्यासाठी , रोपांची पुर्नलागवड झाल्यानंतर १५ ते २० दिवसांनी आणि पुन्हा २५ ते ३० दिवसांनी विरूध्द दिशेने , लाकडी फळी (६-८ किलो वजन , ६-८ फूट लांब व १५ सेमी रूद) ८ ते १० पाणी पातळी असताना ओढून रोपांना वाकविण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| **कापूस** | पिक वाढीची अवस्था | पिकावरील मावा व तुडतुड्यांच्या नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्काची फवारणी , क्रायसोपा अंडी ५००००/- प्रति हेक्टरी पिकावर सोडावीत , फ्लोनिकॅमिड ५० डब्ल्यू. जी. २ ग्रॅम किंवा बुप्रोफेझीन २५ एससी २० मिली किंवा डायफेन्थुरॉन ५० डब्ल्युपी १२ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारावे. हुमणी अळीच्या नियंत्रणासाठी मेटारायाझीयम अनिसोप्ली ५० ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून आळवणी करावी. अंतरमशागतीच्या वेळेस अळया गोळा करून नष्ट कराव्यात. |
| **सोयाबीन** | पिक वाढीची अवस्था | पाने खाणाऱ्या आळीच्या नियंत्रणासाठी पिकामध्ये हेक्टरी ५ याप्रमाणे स्पोडोप्लुरचा वापर करून फिरोमोन सापळे लावा तसेच प्रकाश सापळयांचा ही शक्य झाल्यास वापर करावा. |
| **मका** | पिक वाढीची अवस्था | उभ्या पिकांमध्ये अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करु नये. |
| **तूर** | फांद्या फुटण्याची अवस्था | शेंडा पोखरणाऱ्या अळी व स्पोडोपटेरा अळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा निंबोळीयुक्त किटकनाशक ॲझाडिरेक्टीन ०.०३ टक्के (३०० पी.पी.एम.) ५ मि.ली. प्रती लिटर पाणी किंवा इंडोक्झाकार्ब १४.५ टक्के एस.सी. प्रवाही ७ मि.ली. किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ टक्के एस.जी. ३ मि.ली. प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात सकाळी वारा शांत असताना स्टिकर १ मि.ली. मिसळून प्रती लिटर या प्रमाणे पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| **मुग व उडीद** | पिक वाढीची अवस्था | सध्याच्या ढगाळ हवामानामुळे रस शोषणार्या किडीच्या नियंत्रणासाठी २ मिली इमेडॉक्लोप्रिड १७.८ % ईसी प्रती १० लिटर पाण्यात मिसळून उघडीप बघून फवारावे. |
| **भाजीपाला पीके** | | खरीप हंगामातील भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा. |
| **टोमॅटो** | पिक वाढीची अवस्था | टोमॅटो या पिकावर प्रामुख्याने विषाणू रोगाचा प्रसार हा फुलकिडे, पांढरी माशी, मावा, तुडतुडे या किडीमुळे होतो. त्यासाठी या किडींचा सुरवातीपासुनच बंदोबस्त केल्यास रोगाचे प्रमाण कमी ठेवता येते. शेतामध्ये हे रोग आढळल्यास कमी प्रमाणात असतांनाच रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. या किडींच्या बंदोबस्तासाठी सायेंनट्रेनिलीप्रोल १०.२६% ओडी १८ मिली प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून आठवडयाच्या अंतराने पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| **वांगी** | पिक वाढीची अवस्था | शेंडा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी लागवडीनंतर २० दिवसांनी दर आठवड्याला किडलेले शेंडे व फळे आढळल्यास ती गोळा करून नष्ट करावीत किंवा खोल खड्ड्यात पुरून टाकावी तसेच ५ % निंबोळी अर्क किंवा सायपरमेथ्रिन २५ % ई.सी. ४ मिली किंवा क्लोरोपायरीफॉस २०% ई.सी. २० मिली. किंवा स्पिनोसॅड ४५% एस.सी. ४ मिली प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून साध्या हातपंपाने फवारावे. शेतामध्ये फळ पोखरणाऱ्या अळीसाठी एकरी ४० कामगंध सापळे (फनेल टाईप) वापरावेत. |

| | | |
|---|---|---|
| **कांदा** | पिक वाढीची अवस्था | करपा रोगाच्या नियंत्रणासाठी डायफेनकोनॅझोल २५% ई.सी.१० मिली १० लिटर पाण्यात किंवा टेब्युकोनॅझोल १० मिली प्रती १० लिटर पाण्यात किंवा अॅझोक्सिस्ट्रोबीन १८.२% + डायफेनकोनॅझोल ११.४% १० मिली प्रती १० लिटर पाण्यात किंवा अॅझोक्सिस्ट्रोबीन ११% + टेब्युकोनॅझोल १८.३% १० मिली प्रती १० लिटर पाण्यात किंवा किटाझेज ४८% इसी १० मिली प्रती १० लिटर पाण्यातून १० ते १५ दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून फवारावेत. फवारणी करताना स्टिकरचा वापर करवा. |
| **ऊस** | पिक वाढीची अवस्था | हुमणी आळीच्या भुंग्यांचा वावर हा प्रामुख्याने संध्याकाळी ६ ते ८ वाजेच्या दरम्यान असतो. त्याकरीता हेक्टरी पाच प्रकाश सापळे, संध्याकाळी ६ ते ८ वाजेच्या दरम्यान लावावे. बांधाच्या कडेला असलेल्या लिंब आणि बाभळीच्या झाडांवर हुमणीचे भुंगे जास्त प्रमाणात आढळतात तरी सामूहिकरीत्या ते गोळा करून नष्ट करावेत. जमिनीत शेणखत टाकण्यापूर्वी त्यामध्ये ०१ किलो मेटारायाझीयम बुरशी मिसळावी.<br>आडसाली ऊस लागवडीसाठी वाणांची निवड : फुले ऊस १५०१२, फुले ऊस १३००७, कोएम ८८१२१ (कृष्णा), को ८६०३२ (नीरा), कोएम ०२६५ (फुले २६५)<br>बीजप्रक्रिया: बुरशीजन्य रोगांचा बंदोबस्त करण्यासाठी बेणे लागणीपूर्वी १० लिटर पाण्यात १० ग्रॅम कार्बेन्डॅझिमची १० मिनीटांसाठी बेणे प्रक्रिया करावी. त्यानंतर हेक्टरी १० किलो अॅसेटोबॅक्टर + १.२५ किलो पी.एस.बी. १०० लिटर पाण्यात ३० मिनिटे जीवाणू बीजप्रक्रिया करावी. यामुळे नत्रखतामध्ये ५०% ची तर स्फुरदखतामध्ये २५% ची बचत करता येते.<br>लोकरी माव्याच्या जैविक नियंत्रणासाठी डिफा अॅफिडीव्होरा १००० अळी किंवा कोष प्रति हेक्टर किंवा मायक्रोमस क्रायसोपर्ला २५०० अळी प्रति हेक्टर १५ दिवसांचे अंतराने प्रसारित करावे. |
| **सीताफळ** | पिक वाढीची अवस्था | बागेतील जमिनीत कॅल्शिअमची कमतरता असल्यास सीताफळाची वरची पाने गडद हिरवी होऊन नंतर पिवळी होतात. फळे तोंडाकडील बाजूस काळी पडतात त्यासाठी माती परीक्षण करून त्यानुसार बागेस कॅल्शिअमयुक्त रासायनिक खतांचा वापर करावा. |
| **केळी** | पीक वाढीची अवस्था | विषाणु रोगांचा प्रसार मावा किडी मार्फत होत असल्याने या किडीच्या नियंत्रणास डायमेथोएट (३० ई.सी) २० मि.ली + निंबोळी अर्क ५० मि.ली + १० लिटर पाणी एकत्रित करून फवारावे तसेच मावा किडीचा प्रादुर्भाव जास्त असल्यास इमिडॅक्लोप्रीड (१७. ५ एस.एल.) ५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारावे.<br>शेंडा पोखरणाऱ्या किडीच्या नियंत्रणासाठी क्लोरपायरीफॉस २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी.<br>लागवडीनंतर केळीसाठी ७५ दिवसांनी प्रति झाडास ८२ ग्रॅम युरियाचा डोस द्यावा. जमिनीतून रासायनिक खते देतांना त्यांचा कार्यक्षमपणे उपयोग होण्यासाठी खोल बांगडी पद्धतीने द्या वेत व मातीने झाकावीत. खते वाफसा असताना द्यावीत. |
| **द्राक्ष** | पीक वाढीची अवस्था | ढगाळ व पावसाळी हवामानामुळे द्राक्ष पिकावरील फुलकिड्यांच्या प्रभावी नियंत्रणासाठी स्पिनोसॅड ४५% एस.सी. २.५ मिली प्रति १० लि. पाणी किंवा फिप्रोनिल ८० डब्ल्यू.जी.०.६ मिली प्रति १० लि. पाणी या प्रमाणात दोन फवारण्या १० दिवसाच्या अंतराने द्याव्यात.<br>मिलीबगच्या नियंत्रणासाठी बागेतील तणे उपटून त्याचे नियंत्रण करणे, बागेत स्वच्छता राखणे तसेच पिवळया चिकट सापळयांचा वापर आणि रासायनिक नियंत्रणासाठी बुप्रोफेझीन २५% एस.सी. १५ मिली. अथवा लेकॅनीसीलीयम लेकॅनी ५० ग्रॅ. + ५० मिली दुध १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी (तापमान ३० सेंटीग्रेड पेक्षा कमी व आर्द्रता ६५ टक्के पेक्षा जास्त असणे आवश्यक). |
| **आंबा** | पीक वाढीची अवस्था | पावसाळयात पूर्ण वाढ झालेल्या झाडास ५० कि. शेणखत + १५०० ग्रॅम नत्र + ५०० ग्रॅम स्फुरद + ५०० ग्रॅम पालाश द्यावे. यापैकी नत्राचा हप्ता जुलै व सप्टेंबरमध्ये दोन समान हप्त्यात विभागून द्यावा. तर स्फुरद व पालाश जुलैमध्ये एकाच हप्त्यात द्यावे.<br>३x२ किंवा ४ x२ मीटर अंतरावर अतिघन लागवड केलेल्या आंबा बागेतील झाडांना ३ वर्षांनंतर झाडांच्या आकारमानानुसार पॅक्लोब्युट्राझोल ०.५ ग्रॅम क्रियाशिल घटक प्रती फुट या प्रमाणात ऑगस्ट महिन्यात द्यावे. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | जनावरांच्या पिण्यात दूषित किंवा गाळ मिश्रित पाणी जाणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे जंत निर्मूलन करून घ्यावे. कोवळया गवतामुळे होणारी बुळकांडी रोगाकरिता सल्फा गोळयाचा वापर करावा. जनावरांना मोकळया जागेत बांधू नये. त्यांना गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीत ठेवावे.<br>लम्पी चर्म रोगाने बाधित गाव व बाधित गावालगतच्या ५ किलोमीटर परिसरातील गोवर्गीय पशुधनास प्रतिबंधात्मक लसीकरण गोट पॉक्स लसीद्वारे करण्यात यावे. लम्पी चर्म रोगाने आजारी जनावरांसाठी त्वरित औषधोपचार करण्यात येऊन रोगाचा इतरत्र फैलाव होऊ नये यासाठी गोठा स्वच्छता , जैवसुरक्षा व विविध निर्जंतुक औषधांची फवारणी करावी. पशु पालकांनी लम्पी चर्मरोग बाधित पशुधनास उपचार करणेसाठी १९६२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.<br>जनावरांमधील अँथ्रॅक्स **(Anthrax)** या रोगाच्या नियंत्रणासाठी ऑगस्ट महिन्यात केवळ रोग वारंवार उद्भवणाऱ्या भागात वर्षातून एकदा लसीकरण करून घ्यावे. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी** | | |

**घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ.म.वि., पुणे.

दि. : १२.०८.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**